तक्रार क्रमांक : 187

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/४२८८२/२०२२

प्रति, दिनांक: ०९/०९/२०२२

मा.अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

**विषयः- मौजे कोलमांडला ता. मुरुड येथील समुद्र किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रात (पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६) कायद्याचे उल्लंघन करत तसेच बेकायदेशीरपणे झाडांची कत्तल तसेच बेकायदेशीपणे झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केलेबाबत..**

संदर्भ:- १) आपलेकडील पत्र जा.क्र.ल.ले./समिती/४७/सन २०२२-२३
दिनांक १०/०६/२०२२.
२) आपलेकडील पत्र जा.क्र.अप्रमुवस/कांक/सर्वे/७६१/२०२२-२३
दिनांक २१/०७/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. प्रतिक कनागी यांनी आपल्या कार्यालयाकडे ईमेलव्दारे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार मुरुड यांनी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांजकडे सादर केलेल्या अहवालान्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी त्यांचेकडील दि. २७/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. प्रतिक कनागी, रा. कोलमांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांचेकडील दिनांक १९/०५/२०२२ व १२/०७/२०२२ रोजीचे ईमेलव्दारे सादर केलेले तक्रार अर्ज. |
| २. | तक्रारीचा विषय | मौजे कोलमांडला ता. मुरुड येथील समुद्र किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रात (पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६) कायद्याचे उल्लंघन करत तसेच बेकायदेशीरपणे झाडांची कत्तल तसेच बेकायदेशीपणे झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केलेबाबत |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे कोलमांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट नंबर ४९ व ५४ |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) तहसिलदार मुरुड<br>२) सहाय्यक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग<br>३) वन परिक्षेत्र अधिकारी, फणसाड (वन्यजीव) अभयारण्य<br>४) बंदर निरीक्षक, महराष्ट्र मेरीटाईम बोर्ड बोर्ली मांडला<br>५) उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मुरुड<br>६) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ महाराष्ट्र नियंत्रण मंडळ<br>७) वन परीक्षेत्र अधिकारी, मुरुड<br>८) मंडळ अधिकारी, बोर्ली |

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 844
दिनांक 12/09/2022
मुख्य लेखापाल
उप वनसंरक्षक

Complaint
Survey

| | | |
|---|---|---|
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | **१. तहसिलदार मुरूड :-**<br>मंडळ अधिकारी, बोर्ली यांनी दिनांक १३/०६/२०२२ व दिनांक १५/०६/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार गट नं. ४९,५४ व खाडीलगत केलेल्या भरावाबाबत गट नं. ४९ चे भोगवटादार श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांना रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र) एवढया रकमेच्या दंडाची नोटीस बजावण्यात आली असून दोन दिवसाचे आत समक्ष खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांनी विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यामुळे तहसिलदार मुरूड यांनी दिनांक ११/०७/२०२२ अन्वये रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र ) चे दंडनिय आदेश पारित करुन आठ दिवसांच्या आत रक्कम शासन जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर रक्कम आठ दिवसांच्या आत शासन जमा न केल्यास मिळकतीवर बोजा ठेवण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.<br>**२. सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड-अलिबाग :-**<br>सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९ हा CRZ ( बहुतांश ५० मी. Mangrove Buffer Zone (CRZ-IA) व उर्वरित CRZ-III NDZ मध्ये समाविष्ट आहे. तसेच Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. गट नं. ५४ भागश: CRZ-I व भागश: CRZ-III NDZ मध्ये समाविष्ट आहे व Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पर्यावरण वन व वन्यजीव विभागाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या किनारा व्यवस्थापन CRZ अधिसुचनेतील तरतुद क्र.३ (iv) नुसार CRZ अधिसुचित क्षेत्रामध्ये जमीन भराव ( Land Reclamation ) हा वापर प्रतिबंधित वापरामध्ये नमुद आहे.<br>**३. वनपरिक्षेत्र अधिकारी,फणसाड (वन्यजीव) अभयारण्य :-**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं.४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे मालकी क्षेत्र फणसाड (वन्यजीव) अभयारण्याच्या मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं.५४ ला लागून असून सदर गट नंबरच्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मॅग्रोव्हच्या झाडांवर मातीचा भराव केल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ मधील अभयारण्याच्या ताब्यात असलेल्या वनक्षेत्रात झालेल्या भरावावर परिमंडळ काशिद यांनी APF/०१/२०२२-२३ दिनांक १०/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाची चौकशी वनपाल काशिद करत आहेत. सदर चौकशीअंती फणसाड (वन्यजीव) अभयारण्य मधील मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.<br>**४. बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड बोर्ली मांडला :-**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ व ५४ तसेच खाडीकिनारी असलेल्या जमिनीवर संपुर्ण मातीचा भराव करुन कांदळवनाचा नाश केल्याचे निदर्शनास आले आहे.<br>**५. उप अधिक्षक,भूमी अभिलेख मुरुड :-**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) ता. मुरुड येथील गट नं. ४९, ५४ ची इकडील कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक २६/०५/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर मोजमापे घेतली असता गट नं. ४९ चे खाडी कडील भागामध्ये गट नं. ५४ व खाडी लगतच्या क्षेत्रामध्ये भराव केलेला दिसून येत असून त्याबाबतचा अंदाजित नकाशा दिनांक ०२/०६/२०२२ रोजीच्या पत्रासोबत तहसिलदार मुरुड यांना सादर केला आहे. मौजे कोलमांडला ता. मुरुड येथील गट नं. ५४ व खाडीमध्ये किती भराव केला आहे त्याचे क्षेत्र पाहिजे असल्यास गट नं. ४९ व ५४ च्या धारकांनी मोजणी करुन घेणे |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक आहे.<br>**६. उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ :-**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथील गट नं. ४९ ,५४ व खाडीलगतच्या जागेवर भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे.<br>**७. वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरुड :-**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे क्षेत्र तालुका भुमी अभिलेख मुरुड यांनी सदर क्षेत्राची हद्द दाखवुन दिली. हे मालकी क्षेत्र फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या मौजे कोलमांडला ताराबंदर या गट नं. ५४ ला लागुन असुन सदर गट नंबरच्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आले. गट नं. ४९ मध्ये मातीचा भराव झालेला असल्याने कांदळवन होते किंवा नव्हते याबाबत निश्चित सांगता येत नाही. तसेच गट नं. ५४ हे फणसाड अभयारण्याकडे आहे. सदर गट नंबर मध्ये सुध्दा मातीचा भराव केल्याचे दिसुन आलेबाबत वनपाल बोर्ली यांनी अहवालामध्ये उल्लेख केला आहे. गट नं. ४९ हे मालकी क्षेत्र व गट नं. ५४ हे फणसाड वन्यजीव अभयारण्यातंर्गत येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच वन परिक्षेत्र अधिकारी, मुरुड यांनी यांचेकडील पत्र क्र.अ/गुन्हे/११८/सन २०२२-२३ दिनांक ११/०५/२०२२ अन्वये मौजे कोलमांडला गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.० या मालकी क्षेत्रामध्ये कांदळवन वृक्षाची तोड होत आहे हे खरे आहे परंतु सदरचे क्षेत्र खाजगी मालकीचे असल्यामुळे महसुल व पोलिस यांच्याकडुन पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झालेला आहे. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालयाकडील दि. १०/११/२०१० रोजीच्या अधिसुचनेव्दारे पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे १९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी श्री. आगारजा हुसेन झाकीर हुसेन, रा. कोलमांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांचेविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग येथे रे.के.नं. ८४/२०२२ दिनांक १२/०७/२०२२ अन्वये पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम १५ नुसार फिर्याद दाखल करण्यात आली आहे. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | श्री. आरारजा हुसेन झाकीर हुसेन, रा. कोलमांडला, ता. मुरुड, जि. रायगड |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ |

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

9/9/22

(डॉ.पद्मश्री बैनाडे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

923

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग
तहसिल कार्यालय, अलिबागच्या मागे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२४४३४❖फॅक्सक्र:०२१४१-२२४४३४❖
❖ ई-मेल : sdoalibag@gmail.com ❖

| क्र.उविअ/कात-३/कांदळवन/तक्रार/मौजे.कोलमांडला/२०२२ | दिनांक: २७/०७/२०२२ |
|---|---|

प्रति,

मा.जिल्हाधिकारी सो.
रायगड-अलिबाग (महसूल शाखा)

**विषय:- मौजे कोलमांडला, ता.मुरुड येथील समुद्र किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रात (पर्यावरणसंरक्षण अधिनियम १९८६) कायद्याचं उल्लंघन करत तसेच बेकायदेशीरपणे झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केलेबाबत.**

संदर्भ :-१) अर्जदार प्रतिक प्रमोद कणगी यांजकडील दि.०१/०६/२०२२ रोजीचा अर्ज.
२) कोळी महादेव समाज ताराबंदर यांजकडील दि.२७/०५/२०२२ रोजीचा अर्ज.
३) वन परिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, अलिबाग-रायगड यांचेकडील दि.१४/०६/२०२२ रोजीचे पत्र.
४) अर्जदार श्री. मनोहर महादेव ठाकूर, रा.चिंचघर,ता.मुरुड, जि.रायगड यांचा दि.०९/०५/२०२२ रोजीचा अर्ज.(या कार्यालयास प्राप्त दि.०३/०६/२०२२)
५) पोलीस निरीक्षक, रेवदंडा पोलीस ठाणे यांचेकडील पत्र क्र.१७२८/२०२२, रेवदंडा पोलीस ठाणे, दि.१६/०६/२०२२.
६) ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली यांचा दिनांक २०/०५/२०२२ रोजीचा अर्ज (या कार्यालयास प्राप्त दि.२०/०७/२०२२)
७) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/६१६१२२/२०२२, दि.१६/०६/२०२२.
८) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२०२२, दि.०९/०६/२०२२.
९) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/३२१५८/२०२२, दि.१४/०६/२०२२.
१०) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/३०२८२/२०२२, दि.१४/०६/२०२२
११) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२८९८०/२०२२, दि.०६/०६/२०२२.
१२) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-३/३१११८/२०२०,दि.१४/०६/२०२२
१३) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२६२६५/२०२२, दि.३१/०५/२०२२
१४) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/३३१६१/२०२२, दि.२१/०६/२०२२.
१५) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/३३१६६/२०२२, दि.२१/०६/२०२२.
१६) आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/३९१००/२०२२, दि.१९/०७/२०२२
१७) तहसिलदार मुरुड यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-१/ताराबंदर/कांदळवन/भराव/२०२२, दि.०१/०७/२०२२

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
मध्यवर्ती नोंदणी शाखा
आवक क्र. 42822
दिनांक 28 JUL 2022
महसूल - क-3

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते कि, अर्जदार श्री. प्रतिक प्रमोद कणगी व श्री. वैभव पांडूरंग भोईर, कोळी महादेव समाज, ताराबंदर, मु. ताराबंदर, पो. बोर्ली-मांडला, ता.मुरुड, श्री. अनिस सुलतान तांडेल व श्री. मनोहर महादेव ठाकूर यांनी आपल्या कार्यालयाकडे तक्रार अर्ज सादर केलेले असून सदर अर्जाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडील पत्र दि. ३१/०५/२०२२ या कार्यालयास प्राप्त दि. ०१/०७/२०२२ अन्वये प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थितीबाबत चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करून अहवाल सादर करणेबाबत कळविलेले आहे. सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने व आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. ७ ते १६ चे अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र दि. २०/०६/२०२२ अन्वये तहसिलदार मुरुड व उप अधिक्षक भूमी अभिलेख मुरुड यांजकडून सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

प्रकरणी मौजे कोलमांडला (ताराबंदर ) येथील गट नं.४९, ५४ व खाडी मध्ये झालेला अनधिकृत भराव . कांदळवन नाश व CRZ कायदयाचे उल्लंघन बाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील सीआरझेड समिती सदस्य व कांदळवन समिती सदस्य यांनी दिनांक २४/०६/२०२२ रोजी संयुक्त स्थळपहाणी केली असुन संबंधित विभागांकडील स्वंतत्र अभिप्रायानुसार स्थळपहाणी अहवाल दि. ०१/०७/२०२२ रोजी तहसिलदार मुरूड यांचेमार्फत या कार्यालयास सादर करण्यात आला असून संबंधित विभागांकडील तांत्रिक बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे अभिप्राय कळविले आहेत.

**१. सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड- अलिबाग**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९ हा CRZ ( बहुतांश ५० मी. Mangrove Buffer Zone ( CRZ-IA ) व उर्वरित CRZ-III NDZ मध्ये समाविष्ठ आहे. तसेच Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. गट नं. ५४ भागश: CRZ-I व भागश: CRZ-III NDZ मध्ये समाविष्ठ आहे व Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पर्यावरण वन व वन्यजीव विभागाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या किनारा व्यवस्थापन CRZ अधिसुचनेतील तरतुद क्र.३ (iv) नुसार CRZ अधिसुचित क्षेत्रामध्ये जमीन भराव ( Land Reclamation ) हा वापर प्रतिबंधित वापरामध्ये नमुद आहे.

**२. वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड (वन्यजीव) अभयारण्य**

मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे मालकी क्षेत्र फणसाड (वन्यजीव) अभयारण्याच्या मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं.५४ ला लागून असून सदर गट नंबरच्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मॅंग्रोच्या झाडांवर मातीचा भराव केल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ५४ मधील अभयारण्याच्या ताब्यात असलेल्या वनक्षेत्रात झालेल्या भरावावर परिमंडळ काशिद यांनी APF/01/2022-23 दिनांक १०/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद केला असून सदर गुन्ह्याची चौकशी वनपाल काशिद करत आहेत. सदर चौकशीअंती फणसाड (वन्यजीव) अभयारण्य मधील मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ५४ अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

**३. बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड बोर्ली मांडला**

मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ४९ व ५४ तसेच खाडीकिनारी असलेल्या जमिनीवर संपुर्ण मातीचा भराव करुन कांदळवनाचा नाश केल्याचे निदर्शनास आले आहे.

**४. उप अधिक्षक,भूमी अभिलेख मुरुड**

मौजे कोलमांडला (ताराबंदर) ता. मुरुड येथील गट नं. ४९ , ५४ ची इकडील कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक २६/०५/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर मोजमापे घेतली असता गट नं. ४९ चे खाडी कडील भागामध्ये गट नं. ५४ व खाडी लगतच्या क्षेत्रामध्ये भराव केलेला दिसून येत असून त्याबाबतचा अंदाजित नकाशा दिनांक ०२/०६/२०२२ रोजीच्या पत्रासोबत तहसिलदार मुरुड यांना सादर केला आहे. मौजे कोलमांडला ता. मुरुड येथील गट नं. ५४ व खाडीमध्ये किती भराव केला आहे त्याचे क्षेत्र पाहिजे असल्यास गट नं. ४९ व ५४ च्या धारकांनी मोजणी करुन घेणेबाबत उचित वाटते.

**५. उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ ,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ**

मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथील गट नं. ४९ ,५४ व खाडीलगतच्या जागेवर भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे.

**६. वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरुड**

मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे क्षेत्र तालुका भुमी अभिलेख मुरुड यांनी या क्षेत्राची हद्द दाखवुन दिली. हे मालकी क्षेत्र फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या मौजे कोलमांडला ताराबंदर या गट नं. ५४ ला लागुन असुन सदर गट नंबर च्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आले. गट नं. ४९ मध्ये मातीचा भराव झालेला असल्याने कांदळवन होते किंवा नव्हते याबाबत निश्चीत सांगता येत नाही. तसेच गट नं. ५४ हे फणसाड अभयारण्याकडे आहे. सदर गट नंबर मध्ये सुध्दा मातीचा भराव केल्याचे दिसुन आलेबाबत वनपाल बोर्ली यांनी अहवालामध्ये उल्लेख केला आहे. गट नं. ४९ हे मालकी क्षेत्र व गट नं. ५४ हे फणसाड वन्यजीव अभयारण्यातंर्गत येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच वन परिक्षेत्र अधिकारी, मुरुड यांनी यांचेकडील पत्र क्र. अ/गुन्हे/११८/सन २०२२-२३ दिनांक ११/०५/२०२२ अन्वये मौजे कोलमांडला गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.० या मालकी क्षेत्रामध्ये कांदळवन वृक्षाची तोड होत आहे हे खरे आहे परंतु सदरचे क्षेत्र खाजगी मालकीचे असल्यामुळे महसुल व पोलिस यांच्याकडुन पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे अभिप्राय दिलेले आहेत.

सदर जागेची स्थळपहाणी वेळी श्री. डी.एस.अहिरे, शिरस्तेदार , उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी सदर जागेचा नकाशा व MRSAC यांचेकडील नकाशा सर्व सदस्यांना दाखविला असता MRSAC यांचेकडील नकाशामध्ये मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी कांदळवन (Mangrove Dense) असल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे. परंतु स्थळपहाणी वेळी गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी केलेल्या भरावामुळे कांदळवन दिसुन आले नाही.

सदर जागेची स्थळपहाणीच्या वेळेची वस्तुस्थिती पाहाता गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी झालेल्या भरावाखाली कांदळवन (Mangrove Dense) दबल्याचे/दडपल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

वरील अहवाल पाहता जमिनमालक यांचे गट नं. ४९ व त्यालगतचा गट नं. ५४ मध्ये भराव झाल्याचे निष्पन्न झाले आहे. गट नं. ४९ लगत असलेला गट नं. ५४ हा "**महाराष्ट्र शासन राखीव वन** "सरकारी दाखल असला तरी सदर गट नं. मध्ये झालेला भराव हा लगतचा गट नं. ४९ चे जमिनमालक यांचा हितसंबंध असल्याशिवाय गट नं. ५४ मध्ये अन्य इसम भराव करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सबब मंडळ अधिकारी, बोर्ली यांनी दिनांक १३/०६/२०२२ व दिनांक १५/०६/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार गट नं. ४९,५४ व खाडीलगत केलेल्या भरावाबाबत गट नं. ४९ चे भोगवटादार श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांना रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र ) एवढ्या रकमेच्या दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे. दोन दिवसाचे आत समक्ष खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांनी विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यामुळे तहसिलदार मुरूड यांचे कार्यालयाकडुन दिनांक ११/०७/२०२२ अन्वये रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र ) चे दंडनिय आदेश पारित करुन आठ दिवसांच्या आत रक्कम शासन जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. आठ दिवसांच्या आत रक्कम शासन जमा न केल्यास मिळकतीवर बोजा ठेवण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी या कार्यालयामार्फत मुरूड तालुक्यातील कोलमाडंला (तारावंदर) येथे भराव करून कांदळवनाची कत्तल करणारे गट नं. ४९ चे भोगवटादार श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांचे विरोधात मा. मुख्य न्यायदंडाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार रे.के.न. ८४/२०२२, दि. १२/०७/२०२२ अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

तरी सदर तक्रार अर्ज आपल्या स्तरावर निकाली काढणेस विनंती आहे. सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात माहिती पुढील कार्यवाहीस्तव आपल्या कार्यालयाकडे सादर करणेत येत आहे.

Dagre

(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

| अ.क्र | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | १. श्री. प्रतिक प्रमोद कणगी यांचा दिनांक ०१/०६/२०२२ रोजीचा अर्ज<br>२. श्री.वैभव पांडुरंग भोईर, अध्यक्ष कोळी महादेव समाज ताराबंदर यांचा दिनांक २७/०५/२०२२ रोजीचा अर्ज<br>३. श्री. अनिस सुलतान तांडेल यांचा दिनांक २१/०६/२०२२ रोजीचा अर्ज<br>४. श्री. मनोहर महादेव ठाकूर यांचा दिनांक २१/०६/२०२२ रोजीचा अर्ज |
| २ | तक्रारीचा विषय | मौजे कोलमांडला, ता.मुरुड येथील समुद्र किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रात (पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६) कायद्यांचं उल्लंघन करत तसेच बेकायदेशीरपणे झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केलेबाबत. |
| ३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा. स.नं., गावाचे नांव, तालुका | मौजे कोलमांडला, ता.मुरुड येथील सर्व्हे नं. ४९ व ५४ मध्ये मॅग्रोज झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केलेबाबत. |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नांव व पदनाम | १. तहसिलदार मुरुड<br>२. सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग<br>३. वन परिक्षेत्र अधिकारी, फणसाड (वन्यजीव) अभयारण्य<br>४. बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड बोर्ली मांडला<br>५. उप अधिक्षक, भूमी अभिलेख मुरुड<br>६. उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ महाराष्ट्र नियंत्रण मंडळ<br>७. वन परिक्षेत्र अधिकारी, मुरुड<br>८. मंडळ अधिकारी बोर्ली |
| ५ | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती. | **२. सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड- अलिबाग**<br>सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९ हा CRZ ( बहुतांश ५० मी. Mangrove Buffer Zone ( CRZ-IA ) व उर्वरित CRZ-III NDZ मध्ये समाविष्ठ आहे. तसेच Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. गट नं. ५४ भागश: CRZ-I व भागश: CRZ-III NDZ मध्ये समाविष्ठ आहे व Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पर्यावरण वन व वन्यजीव विभागाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या किनारा व्यवस्थापन CRZ अधिसुचनेतील तरतुद क्र.३ (iv) नुसार CRZ अधिसुचित क्षेत्रामध्ये जमीन भराव( Land Reclamation ) हा वापर प्रतिबंधित वापरामध्ये नमुद आहे.<br><br>**३. वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड (वन्यजीव) अभयारण्य**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे मालकी क्षेत्र फणसाड (वन्यजीव) अभयारण्याच्या मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं.५४ ला लागून असून सदर गट नंबरच्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मॅग्रोच्या झाडांवर मातीचा भराव केल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ मधील अभयारण्याच्या ताब्यात असलेल्या बनक्षेत्रात झालेल्या भरावावर परिमंडळ काशिद यांनी APF/01/2022-23 दिनांक १०/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाची चौकशी वनपाल काशिद करत आहेत. सदर चौकशीअंती फणसाड (वन्यजीव) अभयारण्य मधील मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ५४ अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.<br><br>**४. बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड बोर्ली मांडला**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर ) गट नं. ४९ व ५४ तसेच खाडीकिनारी असलेल्या जमिनीवर संपुर्ण मातीचा भराव करुन कांदळवनाचा नाश केल्याचे निदर्शनास आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **५. उप अधिक्षक,भूमी अभिलेख मुरुड**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) ता. मुरुड येथील गट नं. ४९ , ५४ ची इकडील कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक २६/०५/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर मोजमापे घेतली असता गट नं. ४९ चे खाडी कडील भागामध्ये गट नं. ५४ व खाडी लगतच्या क्षेत्रामध्ये भराव केलेला दिसून येत असून त्याबाबतचा अंदाजित नकाशा दिनांक ०२/०६/२०२२ रोजीच्या पत्रासोबत तहसिलदार मुरुड यांना सादर केला आहे. मौजे कोलमांडला ता. मुरुड येथील गट नं. ५४ व खाडीमध्ये किती भराव केला आहे त्याचे क्षेत्र पाहिजे असल्यास गट नं. ४९ व ५४ च्या धारकांनी मोजणी करुन घेणेबाबत उचित वाटते. |
| | | **६. उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ ,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथील गट नं. ४९ ,५४ व खाडीलगतच्या जागेवर भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे. |
| | | **७. वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरुड**<br>मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.०० हे.आर. हे क्षेत्र तालुका भुमी अभिलेख मुरुड यांनी या क्षेत्राची हद्द दाखवुन दिली. हे मालकी क्षेत्र फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या मौजे कोलमांडला ताराबंदर या गट नं. ५४ ला लागुन असुन सदर गट नंबर च्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आले. गट नं. ४९ मध्ये मातीचा भराव झालेला असल्याने कांदळवन होते किंवा नव्हते याबाबत निश्चीत सांगता येत नाही. तसेच गट नं. ५४ हे फणसाड अभयारण्याकडे आहे. सदर गट नंबर मध्ये सुध्दा मातीचा भराव केल्याचे दिसुन आलेबाबत वनपाल बोर्ली यांनी अहवालामध्ये उल्लेख केला आहे. गट नं. ४९ हे मालकी क्षेत्र व गट नं. ५४ हे फणसाड वन्यजीव अभयारण्यातंर्गत येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच वन परिक्षेत्र अधिकारी, मुरुड यांनी यांचेकडील पत्र क्र. अ/गुन्हे/११८/सन २०२२-२३ दिनांक ११/०५/२०२२ अन्वये मौजे कोलमांडला गट नं. ४९ क्षेत्र ०.३६.० या मालकी क्षेत्रामध्ये कांदळवन वृक्षाची तोड होत आहे हे खरे आहे परंतु सदरचे क्षेत्र खाजगी मालकीचे असल्यामुळे महसुल व पोलिस यांच्याकडुन पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे अभिप्राय दिलेले आहेत. |
| | | **८. मंडळ अधिकारी बोर्ली**<br>सबब मंडळ अधिकारी, बोर्ली यांनी दिनांक १३/०६/२०२२ व दिनांक १५/०६/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार गट नं. ४९,५४ व खाडीलगत केलेल्या भरावाबाबत गट नं. ४९ चे भोगवटादार श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांना रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र ) एवढया रकमेच्या दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे. दोन दिवसाचे आत समक्ष खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु श्री. आगारजा हुसैन झाकीर हुसैन रा.कोलमांडला यांनी विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यामुळे तहसिलदार मुरूड यांचे कार्यालयाकडुन दिनांक ११/०७/२०२२ अन्वये रक्कम रुपये २,०९,२६,०४६/- (अक्षरी दोन कोटी नऊ लाख सव्वीस हजार छेहचाळीस मात्र ) चे दंडनिय आदेश पारित करुन आठ दिवसांच्या आत रक्कम शासन जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. आठ दिवसांच्या आत रक्कम शासन जमा न केल्यास मिळकतीवर बोजा ठेवण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | होय, कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | प्रस्तुत प्रकणी भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालयाकडील दि.१०/११/२०१० रोजीच्या अधिसुचनेद्वारे पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार या कार्यालयाकडून श्री. आगारजा हुसेन झाकीर हुसेन, रा. कोलमांडला, ता.मुरुड, जि. रायगड यांचेविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात रे.के.नं. ८४/२०२२ दि. १२/०७/२०२२ अन्वये पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार फिर्याद दाखल करण्यात आली आहे. |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | तक्रार अर्जामध्ये नमूद केल्यानुसार श्री. आगारजा हुसेन झाकीर हुसेन, रा. कोलमांडला, ता.मुरुड, जि. रायगड यांचे विरध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात फिर्याद दाखल केली आहे. |
| ९ | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये फिर्याद दाखल केली आहे. |

(प्रशांत ढगे)
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

(939)

# अलिबाग येथील मे.मुख्य न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

रे.के.न. ६४/२०२२

उपविभागीय अधिकारी अलिबाग,
उपविभाग अलिबाग (प्राधिकृत अधिकारी),
श्री. प्रशांत ढगे
वय ४६ वर्षे, व्यावसाय नोकरी
फिर्यादी
कार्यालयाचा पत्ता-
उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे
कार्यालय, मु.पो.ता.अलिबाग जि.रायगड

विरुध्द

१) श्री. आगारजा हुसेन शाकीर हुसेन, वय ४५ वर्षे — सामनेवाला
रा. कालमांडला,
ता. मुरूड, जि.रायगड

**फिर्याद पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार**

फिर्यादी मा. न्यायालयास विनंतीपुर्वक कळविते ते खालील प्रमाणे

१) सदरची तक्रार पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार दाखल करण्यांत आलेली आहे. फिर्यादी यांना भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालयाकडील दि. १०/११/२०१० रोजीच्या अधिसुचनेद्वारे पर्यावरण (संरक्षण) अधिनियमाचे कलम १९ अन्वये दखल घेण्याचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त अधिसुचनेनुसार फिर्यादी यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन फिर्यादी प्रस्तुतची फिर्याद मा.न्यायलयांत दाखल करीत आहे.

२) अर्जदार श्री. प्रतिक प्रमोद कणगी व श्री. वैभव पांडुरंग भोईर, कोळी महादेव समाज, ताराबंदर, मु. ताराबंदर, पो. बोर्ली-मांडला, ता. मुरुड यांनी या कार्यालयाकडे अनुक्रमे दि. ०१/०६/२०२२ व दि. २७/०५/२०२२ रोजी दाखल केलेल्या अर्जान्वये कळविले आहे की, मौजे कोलमांडला, ता. मुरुड येथील समुद्रकिनारी असलेल्या स.नं. ५४ मध्ये बेकायदेशीरपणे कांदळवनातील झाडांची कत्तल तसेच कांदळवनात माती, दगड यांचा भराव टाकून अतिक्रमण केले आहे. तसेच मौजे कोलमांडला, गट क्र. ४९ ही मिळकत

श्री. आगरजा हुसेन शाकीर हुसेन यांचे नावे असून जमिनीचे हव्यासापोटी श्री. आगरजा हुसेन शाकीर हुसेन यांनी स्थानिक राजकीय पुढा-यांना हाताशी धरून रात्रीचे वेळेस या कांदळवनाची बेसुमार कत्तल करून तेथे मातीचा भराव केलेला आहे व कायदा धाब्यावर बसविला आहे व स्थानिक ताराबंदर वासियांचे वहिवाटी हक्कांस बाधा उत्पन्न करून तेथील कायदा सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल असे वर्तन केले असून स्वमालकीचे जागेत व त्या लगतचे शासकीय जागेत विना परवानगी मातीचा भराव करून शासनाचा हजारो रुपयांचा महसूल बुडवून शासनाचे नुकसान केले आहे. शासकीय जागेतील व सर्व्हे नं. ४९ मधील कांदळवनाची कत्तल करून तेथे मातीचा भराव केल्याप्रकरणी तसेच खाडीत कांदळवनात मातीचा भराव करून प्रवाहाचे मार्ग बंद केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करणेबाबत कळविले आहे.

३) मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांचेकडील दि. २०/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अर्जामध्ये नमूद सदर पत्राच्या अनुषंगाने तहसिलदार मुरुड यांजकडून प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविले असता, तहसिलदार मुरूड यांनी त्यांचेकडील पत्र दि. ०१/०७/२०२२ अन्वये संयुक्त स्थळपहाणी करून खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथील ग.नं. ४९,५४ व खाडीमध्ये झालेला अनाधिकृत भराव, कांदळवन नाश व CRZ कायद्याचे उल्लंघन बाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील सी आर झेड समिती सदस्य व कांदळवन समिती सदस्य यांनी दि. २४/०६/२०२२ रोजी स्थळपहाणी केली असून संबंधित विभागाकडील स्वतंत्र अभिप्रायानुसार स्थळपहाणी अहवाल सादर करण्यात येत आहे.

**१. सहाय्यक संचालक नगर रचना रायगड - अलिबाग**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला येथील ग.नं. ४९ हा CRZ (बहुतांश ५० मी.) Mangrove Buffer Zone (CRZ-IA) मध्ये समाविष्ठ आहे. तसेच Hazard Line ने बाधित होत आहे. गट नं. ५४ भागशः CRZ-I व उर्वरित CRZ-III NDZ मध्ये समाविष्ठ आहे व Hazard Line व HTL ने बाधित होत आहे. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पर्यावरण वन व वन्यजीव विभागाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या किनारा व्यवस्थापन CRZ अधिसूचनेतील तरतूद क्रं. ३ (iv) नुसार CRZ अधिसुचित क्षेत्रामध्ये जमीन भराव (Land Reclamation) हा वापर प्रतिबंधित वापरामध्ये नमूद आहे.

**२. वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड (वन्यजीव) अभयारण्य**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ क्षेत्र ०-३६-०० हे.आर. हे मालकी क्षेत्र फणसाड (वन्यजीव) अभयारण्याच्या मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ ला लागून असून सदर गट नंबरच्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मँग्रोच्या झाडांवर मातीचा भराव केल्याचे निदर्शनास येत आहे.

त्याचप्रमाणे मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ मधील अभयारण्याच्या ताब्यात असलेल्या वनक्षेत्रात झालेल्या भरावावर परिमंडळ काशिद यांनी APF/०१/२०२२-२३, दि. १०/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाची

चौकशी वनपाल काशिद करत आहेत. सदर चौकशीअंती फणसाड (वन्यजीव) अभयारण्य मधील मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

परंतु मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ५४ अभयारण्याच्या हद्दीच्या बाहेरील भागात अवैध भराव तसेच भरावामुळे (कांदळवन) खाजणक्षेत्र असलेल्या मँग्रोची झाडे भरावाखाली दाबून गेली असल्याने सदर क्षेत्र अभयारण्याच्या हद्दीत व ताब्यात येत नसल्यामुळे तहसिलदार मुरूड यांनी पहाणी/तपासणी करून पुढील कार्यवाही करावी.

**३. बंदर निरिक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, बोर्ली मांडला**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता गट नं. ४९ व ५४ तसेच खाडीकिनारी असलेल्या जमिनीवर संपूर्ण मातीचा भराव करून कांदळवनाचा नाश केल्याचे निदर्शनास आले आहे.

**४. उप अधिक्षक, भूमी अभिलेख मुरूड**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला (ताराबंदर ) ता. मुरूड येथील गट नं. ४९, ५४ ची इकडील कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक २६/०५/२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर मोजमापे घेतली असता गट नं. ४९ चे खाडी कडील भागामध्ये गट नं. ५४ व खाडी लगतच्या क्षेत्रामध्ये भराव केलेला दिसून येत असून त्याबाबतचा अंदाजित नकाशा दि. ०२/०६/२०२२ रोजीच्या पत्रासोबत तहसिलदार मुरूड यांना सादर केला आहे. मौजे कोलमांडला, ता. मुरूड येथील गट नं. ५४ व खाडीमध्ये किती भराव केला आहे त्याचे क्षेत्र पाहिजे असल्यास गट नं. ४९ व ५४ च्या धारकांनी मोजणी करून घेणेबाबत उचित वाटते.

**५. उप प्रादेशिक अधिकारी, रायगड -२, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथील गट नं. ४९, ५४ व खाडीलगतच्या जागेवर भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे.

**६. वनपरिक्षेत्र अधिकारी, मुरुड**

सदर जागेची स्थळपहाणी केली असता मौजे कोलमांडला (ताराबंदर) गट नं. ४९ क्षेत्र ०-३६-०० हे.आर. हे क्षेत्र तालुका भूमी अभिलेख मुरूड यांनी या क्षेत्राची हद्द दाखवून दिली. हे मालकी क्षेत्र फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या मौजे कोलमांडला ताराबंदर गट नं. ५४ ला लागून असून सदर गट नंबर च्या बाहेरील लगत खाजण क्षेत्रात मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आले. गट नं. ४९ मध्ये मातीचा भराव झालेला असल्याने कांदळवन होते किंवा नव्हते याबाबत निश्चित सांगता येत नाही. तसेच गट नं. ५४ हे फणसाड अभयारण्याकडे आहे. सदर गट नंबर मध्ये सुद्धा मातीचा भराव केल्याचे दिसून आलेबाबत वनपाल बोर्ली यांनी अहवालामध्ये उल्लेख केला आहे. गट नं. ४९ हे मालकी क्षेत्र व गट नं. ५४ हे फणसाड वन्यजीव अभयारण्यांतर्गत येत असल्याचे निदर्शनास येत आहे.

## ७. मंडळ अधिकारी बोर्ली

सदर जागेची स्थळपहाणी करताना मंडळ अधिकारी, बोर्ली, तलाठी मांडला उपस्थित होते. मंडळ अधिकारी, बोर्ली यांनी सविस्तर अहवाल तहसिलदार मुरूड यांना सादर करण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे.

मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९ ही मिळकत अविभाज्य सत्ता प्रकारामध्ये मोडत असून सदर जागेमधून मातीच्या भरावाची सुरूवात होऊन ती बाजूच्या गट नं. ५४ महाराष्ट्र शासन राखीव वन या मिळकतीमध्ये भराव झालेला आहे. तसेच गट नं. ५४ मधील खाडीतून नव्याने गाळ काढून भराव झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे गट नं. ५४ मध्ये कांदळवनाची झाडे भरावाखाली दबले असल्याचे दिसून येते.

उप अधिक्षक, भूमि अभिलेख मुरूड यांचेकडील दि. ०२/०६/२०२२ च्या पत्राप्रमाणे गट नं. ४९ व ५४ मध्ये किती क्षेत्रामध्ये भराव केलेला आहे. त्याचे क्षेत्र हवे असल्यास दोन्ही मिळकतदारांनी मोजणी करून घेणे उचित वाटते असे म्हटले आहे. प्रत्यक्ष जागेवर गट नं. ४९ येथे काही कर्मचारी दिसून आले तसेच नकाशाप्रमाणे दाखविलेल्या हद्दीनुसार गट नं. ५४ या मिळकतीत केलेल्या भरावात पांढ-या रंगाची फायबर बोट क्रं. MOR-IV ००३७९ ही बोट उभी असल्याचे दिसून आले. तेथील कर्मचारी यांचेकडे चौकशी केली असता सदरची बोट काम सुरू असलेल्या मालकाची आहे असे सांगितले मालकाचे नाव माहित नसलेबाबत सांगितले. भरावाबाबत या कार्यालयात प्राप्त झालेल्या तक्रारदार यांचे जबाब नोंदवले आहेत. तसेच सदर भरावामुळे पूर्वावर मच्छी व्यवसाय करणारे ग्रामस्थ यांना खाडी किनारी बोटीवर जाण्याचा रस्ता बंद झाला आहे. तसेच गट नं. ४९ मध्ये पूर्वीपासून विहीर असून त्याचा उपभोग ग्रामस्थांना घेता येत नाही.

सदर जागेची स्थळपहाणी वेळी श्री. डी. एम. अहिरे, शिरस्तेदार, उप अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी सदर जागेचा नकाशा व MRSAC यांचेकडील नकाशा सर्व सदस्यांना दाखविला असता MRSAC यांचेकडील नकाशामध्ये मौजे कोलमांडला येथील गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी कांदळवन (Mangrove Dense) असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. परंतु स्थळपहाणी वेळी गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी केलेल्या भरावामुळे कांदळवन दिसून आले नाही. सदर जागेची स्थळपहाणी वेळेची वस्तुस्थिती पाहाता गट नं. ४९, ५४ व खाडीकिनारी झालेल्या भरावाखाली कांदळवन (Mangrove Dense) दबल्याचे/ दडपल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

८) तहसिलदार मुरूड यांनी वरीलप्रमाणे सादर केलेल्या अहवालावरुन, मौजे कोलमांडला, ता. मुरुड येथील गट नंबर ४९ या मिळकतीमध्ये जमीन मालक श्री. आगरजा हुसेन झाकीर हुसेन व अज्ञात व्यक्ती यांनी सक्षम प्राधिकारी/ मा.जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्या पूर्व परवानगी शिवाय अनाधिकृतरीत्या मातीचा भराव करुन कांदळवन वृक्षांची तोड केल्याचे आढळून आले आहे. यास्तव सामनेवाला यांनी भारतीय पर्यावरण अधिनियम १९८६, चे कलम ३(१) व १५ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,५४,५५,५६ व ५७ नुसार गुन्हा केलेला आहे. त्यांच्या अशा बेकायदेशीर वागण्याने पर्यावरणाचे अतोनात नुकसान झालेले आहे. प्रस्तुत प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १९ अन्वये केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने तक्रार दाखल केल्याशिवाय कोणतेही न्यायालय त्याची दखल घेणार नाही अशी तरतुद आहे. तसेच पर्यावरण व वन मंत्रालय यांचेकडील दिनांक

१०-११-२०१० च्या अधिसूचनेनुसार उपविभागीय अधिकारी यांना पर्यावरण संरक्षण अधिनियम. १९८६ मधील कलम १९ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

९) सदरचा गुन्हा हा मा.न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात घडला असल्याने व त्याबाबत पर्यावरण (सरंक्षण) कायद्याचे कलम १९ नुसार लेखी तक्रार देण्यांत येत आहे. त्यामुळे सदरचा दावा चालविणेचा या न्यायालयास पुर्ण अधिकार आहे.

१०) सबब, फिर्यादी तर्फे नम्र विनंती की,

या कामी आरोपीस पर्यावरण (सरंक्षण) अधिनियम, १९८६ मधील कलम १५ (१) नुसार कडक शासन करावे ही विनंती आहे.

याकामी फिर्यादी तर्फे साक्षीदार खालीलप्रमाणे :-

१) श्री. गोविंद वाकडे, तहसिलदार मुरूड, ता.मुरूड, जि.रायगड
२) श्री. समीर दि. शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, अलिबाग
३) श्री. पी.एम.पाटील, वन परिक्षेत्र अधिकारी, मुरूड
४) श्री. एस.टी. तवर, प्र. मंडळ अधिकारी, बोर्ली, ता. मुरूड, जि.रायगड
५) श्री. डी. एस. पोटे, सहाय्यक बंदर निरिक्षक महाराष्ट्र सागरी मंडळ बोर्ली-मांडला, ता. मुरूड, जि. रायगड
६) श्री. संदेश पाटील, तलाठी सजा मांडला, ता. मुरुड रायगड
७) श्री., ग्रामस्थ मंडळ ताराबंदर (कोलमांडला) ता. मुरूड जि.रायगड
८) श्री. प्रतिक प्रमोद कणगी, रा. कोलमांडला, ता. मुरूड, जि. रायगड
९) श्री. वैभव पांडुरंग भोईर, कोळी महादेव समाज ताराबंदर, मु. ताराबंदर, पो. बोर्ली-मांडला, ता. मुरूड, जि. रायगड
१०) श्री. मनोहर महादेव ठाकूर, रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता. मुरूड, जि.रायगड
११) अधिक साक्षीदार तपासण्याची संधी फिर्यादिस मिळावी ही विनंती आहे.

येणे प्रमाणे फिर्याद असे.

अलिबाग

ता. १२/०७/२०२२

फिर्यादीची सही

(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी
अलिबाग, उपविभाग अलिबाग

मा. न्यायालयात दाखल.